Exh. 13/D

रे. क. नं. 59 / 2026

## यांचे मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन पेठ वडगांव कोर्टात ...

मोहन विलास पाटील ---- वादी

विरूध्द

विलास निवृत्ती पाटील, वगैरे ----- प्रतिवादी

Order
Other side to say

Sd/-
Jt. CJJD, Pethvadgaon

यातील वादीतर्फे विनंती अर्ज की, –

1. वादीने सदरचा दावा हक्कज्ञापन, कायम मनाई आणि आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही यातील वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटूंबाची मिळकत आहे.

2. प्रतिवादी नं. 1 हे वादी व इतर प्रतिवादी यांचे वडील असून त्यांनी प्रतिवादी नं. 3 याचे दबावापोटी काही खोटे कागद तयार करून दावा मिळकतीमधील काही भाग त्याचे नावे बक्षीसपत्राने नोंद केलेला आहे. सदरचा संपूर्ण प्रकार पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

3. यातील प्रतिवादी नं. 3 हा दांडगाव्याने सदर मिळकतीमध्ये कायम स्वरूपाचे बांधकाम करत आहे. त्यासाठी सदरचे बांधकाम त्यांने थांबवावे असा तुर्तातूर्त मनाई ताकदीचा अर्ज मे. कोर्टात प्रलंबीत आहे. असे असताना प्रस्तुत दाव्याची नोटीस

18/4/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

सदर प्रतिवादी यास लागू झालेनंतर त्याने सदरच्या बांधकामाचे अतीवेगाने काम सुरूच ठेवलेले आहे. त्याबाबतचे फोटो आजरोजी हजर केलेले आहेत.

4. सदर दावेचे कामी आपली लेखी कैफियत व म्हणणे न देता आजही काम सुरूच ठेवलेले आहे. सदर प्रतिवादी कायद्यास जुमानणारा व्यक्ती नाही. त्यामुळे सदर कामी जैसे थे परिस्थिती ठेवणेसाठी व त्याने या पुढे बांधकाम चालू करू नये यासाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडलेले आहे.

5. सबब मे. कोर्टास नम्र विनंती की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये यासाठी स्टेटस्को आदेश होवून मिळावा ही नम्र विनंती

येणेप्रमाणे अर्ज असे.

वडगांव :
दि. 18 / 4 / 2026

मे. जा. व्हावे.

MV PATIL

(वादी)

## अॅ फि डे व्ही ट

मी यातील वादी श्री. मोहन विलास पाटील, व.व.54, धंदा – शेती, रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्यप्रतिज्ञवेर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

वडगांव :
दि. 18 / 4 / 2026

MV PATIL
ॲफिडेव्हीट करणार

18/4/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो

ॲडव्होकेट D.R. Mohite

## प्र ति ज्ञा

मी यातील वादी श्री. मोहन विलास पाटील, व.व. 54, धंदा – शेती, रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा असे.

वडगांव :
दि. 18/4/2026

MVPATIL
प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri. Mohan Vilas Patil
Age 54 of Toap Tal. who is Hatkanangale.
identified by S. D. R. Mohite Adv.
.............whom I know personally
Dated :- 18/4/26

Assistant Superintendent